श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक (पु), यांचे गैरवर्तन प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

आरोग्य विभाग

जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/९६४/२०२६

अहिल्यानगर दिनांक- २५/०१/२०२६

वाचाः- १. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-आश्वी खु., ता.संगमनेर यांचेकडील पत्र क्र. आस्था/३७७/२०२५, दिनांक- २५/०७/२०२५

२. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. आरोग्य/आस्था-३/८१३/२०२५, दिनांक- ११/०९/२०२५

३. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-आश्वी खु., ता.संगमनेर यांचेकडील पत्र क्र. आस्था/७९५/२०२५, दिनांक- २२/१२/२०२५

४. श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक, यांचा दिनांक- १९/१२/२०२५ रोजीचा खुलासा

५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) नुसार

श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक (पु), उपकेंद्र-चनेगांव, प्राथमिक आरोग्य केंद्र-आश्वी खुर्द, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी गैरवर्तन केले असलेने याबाबत संदर्भ क्र.१ चे पत्रासोबत दोषारोप सादर केलेले आहे. सदर दोषारोपाचे अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयाकडील ज्ञापन/दोषारोप संदर्भ क्र.४ चे खुलाशान्वये ठेवण्यात आलेले आरोप स्पष्टपणे मान्य किंवा अमान्य केलेले नाहीत. श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक, यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी विशेष चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

पुढील पानावर...

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.मोहन कडलग, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. .२०२६०९२५५००१२३ .असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 14:32:28
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री.मोहन कडलग, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती संगमनेर,
व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, ता.संगमनेर, जि.अ.नगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.मोहन कडलग, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

३. श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक,
व्दारा- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-आश्वी खु., ता.संगमनेर, जि.अ.नगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.सोमनाथ सुर्यभान म्हस्के, आरोग्य सेवक, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर